**प्रेस नोट दि. ०२/०२/२०१९**

**चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन पुणे येथे सौर उर्जा प्रकल्पाचे उद्‌घाटन**

दि.०२/०२/२०१९ रोजी चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन पुणे येथे १० किलो व्हॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प बसविला असुन ॲडिशनल डायरेक्टर जनरल महा ऊर्जाचे श्री जाधव साहेब, चतु:श्रृंगी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री दयानंद ढोमे, यांचे अथक प्रयत्नाने महाराष्ट्र राज्यातील पहिल्यांदाच चतु:श्रृंगी पोलीस स्टेशनचे इमारतीवर किंमत रुपये ११,००,०००/-रु.(अकरा लाख रुपये) एवढी किंमत असलेला विनामुल्य सौर ऊर्जा प्रकल्प साकार झाला आहे. सदर प्रकल्पाचे मा. पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम व डायरेक्टर जनरल महा ऊर्जा महाराष्ट्र राज्य व यशदाचे प्रमुख श्री लिमये सर यांचे हस्ते सुरु केला आहे. सदर सौर ऊर्जा प्रकल्पामुळे पोलीस स्टेशनचे विज बिलात दरमहा १५ ते १६ हजाराची बचत होणार आहे. सदर प्रकल्पाचे उद्‌घाटन प्रसंगी चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन येथे मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, श्री सुनिल फुलारी, मा. पोलीस उप आयुक्त परि-४ चे श्री प्रसाद अक्कानवरु, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ५ श्री गायकवाड, खडकी विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त मा. श्री कल्याणराव विधाते, चतु:श्रृंगी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री दयानंद ढोमे, चतु:श्रृंगी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गुन्हे, श्रीमती वैशाली गलांडे, महा ऊर्जाचे व्यवस्थापक व सौर ऊर्जा पुणे विभागाचे श्री रोडे व श्री रोहनकर तसेच चतु:श्रृंगी पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी हजर होते.





